**अमरावती महानगरपालिक , अमरावती**

**दिनांक १८/०३/२०२५ रोजी प्राप्त तसेच**

**दिनांक २४/०३/२०२५ रोजी मंजुर सर्वसाधारण सभा ठरावाची प्रत**

**(प्रशासकीय विषय)**

विषय क्रमांक २१९ – अमरावती महानगरपालिका अमरावती वर्ग ४ व वर्ग ३ दिव्यांग धोरणाप्रमाणे अमनपा कर्मचारी श्री. संदिप राजेश्वर रामेकर अग्निशमन विभाग (मदतनिस) यांना निवासी वापराकरीता भुखंड बदलून देणे बाबत

ठराव क्रमांक २१९ – अमरावती महानगरपालिका अमरावती वर्ग ४ व वर्ग ३ दिव्यांग यांना सर्वसाधारण सभा ठराव क्र.-२५ दि. २०/०६/२०१७. कायम दि. २०/०६/२०१७ अन्वये मंजुर झालेल्या धोरणाप्रमाणे अमनपा कर्मचारी श्री. संदिप राजेश्वर रामेकर अग्निशमन विभाग (मदतनिस) यांना निवासी वापराकरीता मौजे - शेगाव स.क्र. २ चा भाग भु.क्र. ८१/२ क्षेत्र-१०२.६ चौ.मी. रुपये ९,३४१७५/-ऐवढ्या रकमेत सर्वसाधारण सभा ठराव क्र.-९० दि. १६/०६/२०२३ रोजीची मान्यता नुसार उक्त भुखंड दि. २४/०८/२०२३ रोजी खरेदी करुन देण्यात आले होते. परंतु, मौक्यावर गैरअर्जदार यांनी उक्त जागेवर सिमांकण करुण दिले नाही. गैरअर्जदार यांनी उक्त जागेबाबत वाद निर्माण केले होते. या कारणाने अर्जदारांना ताबा मिळाला नाही. त्यामुळे गैरअर्जदार यांच्यावर F.I.R. सुद्धा दाखल करण्यात आलेली आहे. श्री. सं[illegible] राजेश्वर रामेकर यांनी उक्त भुखंड खरेदी करीता बँकेमार्फत कर्ज घेऊन उक्त भुखंडाची खरेदी केली व बांधकाम परवानगी काढलेली आहे. बँकेचे हफ्ते सुद्धा ते भरत असल्याने त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे त्यांनी मनपा मालकीचे दुसरा भुखंड मिळणेकरीता दि. २८/०५/२०२४. रोजी अर्ज सादर केलेला आहे. त्याअंनुषंगाने मा. आयुक्त यांचे दि. १०/०२/२०२५ रोजी दुसरा भुखंड देणे संदर्भात मान्यता प्रदान केलेली आहे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव | जागेचे वर्णन | क्षेत्र चौ.मी. | भुखंडाचे मुल्य ASR च्या दिडपट |
|---|---|---|---|---|
| १ | संदिप रामेश्वर रामेकर (अग्निशमन विभाग मदतनिस) | मौजा शेगाव स.क्र-२ चा भाग भु.क्र ८१/२ | १०२.६ चौमी | रु. ९.३४,१७५ |

वरील भुखंडाऐवजी दुसरे भुखंड प्रस्तावित

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव | जागेचे वर्णन | क्षेत्र चौ.मी. | भुखंडाचे मुल्य ASR च्या दिडपट |
|---|---|---|---|---|
| १ | संदिप रामेश्वर रामेकर (अग्निशमन विभाग मदतनिस) | मौजा रहाटगाव स.क्र.- १९७/२भु.क्र. १९AB/२ | १०७.९० चौमी | रु. ६.५८,१९० |

सबब अर्जदार यांचे विनंती नुसार वरील बाब पाहता अर्जदार यांना देण्यात आलेले भुखंड परत घेऊन त्याऐवजी दुसरा भुखंड देण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

| स्वा./- | स्वा./- |
|---|---|
| नगरसचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, अमरावती | महानगरपालिका,अमरावती |

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती